# पर्यावरण संवर्धन आणि समतोल विकास

केतकी घाटे

**पर्यावरण, संवर्धन स्वतःपासून सुरु होतं. स्थानिक पातळीवरील संवर्धनाचे यशस्वी प्रयोग जागतिक पातळीवर ठसा उमटवू शकतात. जाहिरातींच्या युगात 'गरजेचं' रुपांतर 'हावेत' होतं आहे. पर्यावरणविषयक वाढत्या समस्यांचा वेध घेत त्याच्या विघातक परिणामांची जाण जास्त तरुणांपर्यंत पोचवण्यासाठी तरुणांनी केलेले प्रयत्न, विचार या सदरातून एक महिनाआड आपल्यापर्यंत पोहोचवण्याचा आमचा प्रयत्न आहे.**

सध्याची तरुण पिढी पर्यावरणाकडे कसं बघते, हा एक गमतीदार विषय आहे. गमतीदार एवढ्याचसाठी की प्रत्येक तरुणाचा पर्यावरणाकडे बघण्याचा दृष्टीकोन स्थल काल सापेक्ष बदलतो. हे स्वाभाविकच आहे. परंतु एरवी हिरीरीने पर्यावरणविषयक समस्यांविषयी चर्चा करणारा हा तरुण वर्ग, संवर्धनाची वेळ आली की दोन पावलं मागे हटतो. यातही शहरी तरुण आणि ग्रामीण तरुण असा भेद साहजिकच करता येतो. पर्यावरण संवर्धन हे स्वतः पासून सुरु होतं मग ते रोजच्या दिनक्रमातील वस्तू वापरावरचं नियंत्रण असो किंवा प्रत्यक्ष जमिनीवरचं काम असो किंवा आजूबाजूच्या जैवविविधतेकडे आदरपूर्वक बघणे असो. अशा गोष्टी समोर आल्या की पर्यावरण संवर्धन ' गैरसोयीचे सत्य ' वाटू लागतं. परंतु काही तरुण, संस्था, गट मात्र ह्या सत्याचं आवाहन पेलून निसर्गासाठी आपापल्या परीने झटून कार्यरत असल्याचे दिसतात.

काही ठराविक शहरी तरुण सध्या बऱ्यापैकी 'पर्यावरणाकडे' वळलेले आढळतात. काही ठराविक गोष्टी आत्मसात करणे म्हणजे पर्यावरण संवर्धन अशी समजूत शहरात हळू हळू वाढते आहे. उदाहरणार्थ -

पक्षी निरीक्षण, वन्यजीव छायाचित्रण व पर्यटन, स्थानिक झाडांची आवड, सेंद्रिय अन्नधान्य व भाजीपाला मुद्दाम शोधून आणून वापरणे, नाचणी-वरई इत्यादी भरड धन्यांना प्राधान्य, प्लास्टिक पिशवी ऐवजी सुती कापडाची पिशवी, वाहनाचा मर्यादित वापर, पायी चालणे अथवा सायकल वापरण्याची आवड, टिश्यू पेपरला फाटा, सुती कपड्यांना प्राधान्य, शीत पेयांना व बाटलीबंद पाण्याला राम राम, ब्रँडेड वस्तूंचं अनाकर्षण, Whatsapp, Facebook इ. गोष्टींपासून दूर राहणे साधी राहणी इत्यादी.

या सर्वच गोष्टींमुळे निसर्गाला व आपल्यालाही काही अंशी मदत होते आहेच. पण आमचे एक स्नेही म्हणतात त्याप्रमाणे हे गळक्या हौदाची फुटकी तोटी बदलण्यासारखे आहे. आपल्याला हौदच दुरुस्त करायला हवा आहे. पण अर्थातच कुठेतरी सुरुवात होणेही गरजेचे आहे. वरची यादी ही अशीच सुरुवात आहे अस म्हणायला हवं.

यामुळे काय चांगला बदल होतोय तर माणसांची मानसिकता बदलायला सुरुवात आहे. आपसात चर्चेला सुरुवात होते आहे. त्यातून नवनवीन मार्ग सापडताहेत. पण हे सगळं करणारे अगदी हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच आहेत. मोठ्या प्रमाणावर बदल होण्याकरता सरकार, उद्योग जगत, सामान्य व संपन्न जनता सर्वांनी एकत्र येऊन पावले उचलावी लागतील.

उद्योग जगताचा कार्यभाग यात सर्वात मोठा असायला हवा. कारण असे की, सध्या निसर्गाचा सगळ्यात जास्त वापर हा उद्योगांकडूनच होतो आहे आणि पर्यायाने होणाऱ्या प्रदूषणाच प्रमाणही वाढतच आहे. यामुळे आपलीच नैसर्गिक संसाधने जसे की पाणी, हवा, माती, जंगलं प्रदूषित होताहेत. त्याचा ऱ्हास वाढतोच आहे. सरकारने अशा उद्योगांवर नियंत्रण ठेवायला हवे. यातले कुठले उद्योग सामान्य माणसाच्या मूलभूत गरजा भागवण्याकरता उपयोगी आहेत, कुठले ऐषोआरामाची साधने पुरवणारे आहेत, याचा शहानिशा करून व त्याच्या परिणामांची जाणीव ठेऊन निर्णय घ्यायला हवेत, धोरण आखायला हवीत. उद्योग हे वैयक्तिक नफ्यावर आधारलेले असल्याने जणू त्याला काही मर्यादाच नाही अशा थाटात त्यांची वाढ वाढवत ठेवली जाते. यात सामान्य माणसाचा विचार फार केला जात नाही. केला तरी त्याचा निसर्गावर काय परिणाम होतो आहे याचा विचार केला जात नाही.

शेवटी आपण ज्या निसर्गाच्या साठ्याचा कच्चा माल म्हणून वापर करत आहोत, तो आणि त्यावर प्रक्रियेसाठी लागणारी उर्जेची साधने मर्यादित आहेत हे लक्षात घ्यायला हवे. नवनवीन तंत्रज्ञानाने जरी ही उर्जा मिळवण्याचे मार्ग आपण शोधून काढले

तरी ती वापरल्याने होणारे दुष्परिणाम आपल्याला कधीच टाळता येत नाहीत, हे लक्षात घ्यायला हवे. ते हवामान बदलांच्या स्वरुपात माणसावर आपटत राहणार. स्थानिक पातळीवर होणारे बदल कधीना कधी सार्वत्रिक पातळीवर दिसणार.

तीच गोष्ट सकारात्मक बदलांची, विचारांच्या बदलांची ! स्थानिक पातळीवर होणाऱ्या संवर्धनाचे यशस्वी प्रयोग जागतिक पातळीवर ठसा उमटवू शकतील, बदल घडवू शकतील. कदाचित त्याचा वेग अतिशय कमी असेल. पण सुरुवात कुठेतरी व्हायलाच हवी... त्यादृष्टीने वर यादीत उल्लेखलेले बदल कदाचित महत्त्वाचे ठरतील. उणीव फक्त हे बदल वरच्या पातळीवर नेण्याची आहे. परंतु जाहिरातींच्या युगात मानवाची विचारसरणी पूर्णतः बदलली आहे. जगण्याला पैशाची जोड मिळाल्याने आणि तेच प्रतिष्ठेचं मानलं गेल्याने 'गरजेचं' रूपांतर 'हावेत' झालं. पूर्वी केवळ 'आनंदी जगणं' हा हेतू असलेला माणूस 'उपभोग' हे ध्येय ठेऊन जगू लागला आहे. स्वतःचं जीवन सोयीचं, आनंदी करण्यापुरता उपभोगही ठीक होता परंतु गरज आणि हाव यातला उंबरठा ठरवण्याची माणसाची विवेकबुद्धीही या अर्थव्यवस्थेने व जाहिरातबाजीने हिरावून घेतली आहे. त्यामुळे जनतेचा कौल हा जाहिरातीत दाखवल्या जाणाऱ्या साधनानकडेच आहे. इथे सरकारची भूमिका अतिशय महत्त्वाची ठरते. आपल्याच नद्या प्रदूषित करणाऱ्या detergentsसारख्या उत्पादनावर बंदी घालून, कपडे धुण्यासाठीचा पर्यायी मार्ग लोकांपुढे आणणे. आत्ताच्या काळात हे स्वप्नवत वाटेल पण जगात इतर ठिकाणी याची काही उदाहरण देखील दिसतात. अमेरिकेतील फ्लोरिडा शहरात काही नागरी वस्तीत लोक स्वच्छतेसाठी ठराविक पद्धतीने बनवलेली उत्पादने वापरतात जी पर्यावरण पूरक आहेत.

तर मुद्दा असा की केवळ वैयक्तिक पातळीवर बदल करून भागणार नाही तर सामाजिक, राष्ट्रीय पातळीवर बदल व्हायला हवेत. त्याकरता समाजाची तसेच सरकारची मानसिकता बदलावी लागेल. याकरता शिक्षण क्षेत्राचा वाटा अतिशय मोलाचा आहे.

आत्ताचं शिक्षणच मुळी उपजिविकेकरता 'पैसा' मिळवणं गरजेचं आहे, आणि त्या करता अनेक मार्ग कोणते, हे शिकवतं. म्हणजेच पैसा मिळवून तो खर्च करून अन्न मिळवण्याचे अप्रत्यक्ष मार्ग दाखवतं. उपजिविकेसाठी थेट निसर्गातून अन्न मिळवणाऱ्या आदिवासीला किंवा शेतकऱ्याला मागास ठरवलं जातं. त्याने शिक्षण घेऊन पैसा कमावला तरच तो प्रतिष्ठित समजला जातो. त्यामुळे ग्रामीण समाजातला तरुण देखील शेतीकडे वळायला उत्सुक नसतो तर शहराकडे येऊन मोल मजुरी करणं पसंत करतो. त्यात तो स्वतःचं आरोग्य तर हरवून बसतोच शिवाय शहराच्या प्रभावामुळे अधिक पैसा कमावण्याचा ससेमिरा त्याच्यामागे लागतो. आणि वर उल्लेखलेल्या उंबरठ्याच्या पलीकडे जाऊ इच्छितो. ग्रामीण भागात निसर्गाची स्थिती शहरापेक्षा बरी असली तरी ती बदलून शहरी व्हावी अशीच धारणा दिसते. तिथल्या निसर्गाचं महत्त्व त्याअर्थी लोकांना कळल आहे अस दिसत नाही. कळलं असलं तरी तेदेखील जाहिरातीला बळी पडून उपभोगाकडे वळू लागले आहेत. आणि का वळू नयेत? केवळ शहरातल्या लोकांकडेच उपभोगाचा ठेका का? असाही प्रश्न विचारला जातो. पण यातून कुणाचंच भलं होताना दिसत नाही. पर्यावरणाचं तर नाहीच नाही. माणसाचंही नाही. वरकरणी ऐषोआरामाची साधने वाढली तरी मानवाचं आरोग्य दिवसेंदिवस ढासळतच आहे. सामाजिक विषमता, गुन्हेगारीदेखील वाढतेच आहे. मानसिक ताण वाढतो आहे.

परंतु ग्रामीण भागातल्याच काही तरुणांनी मात्र यावर उपाय सुचविलेला दिसतो. उत्तम शेती करून, जोड धंदा करून निसर्गाशी त्याची सांगड घालणारे काही प्रयोग आपल्याकडे होतांना दिसत आहेत. ते आपण पुढच्या काही लेखांद्वारे बघू. आमचे गोळे सर (प्रकाश गोळे, इकॉलॉजीकल सोसायटी) म्हणायचे, 'ग्रामीण तरुणांनी तिथल्या निसर्गाचे व्यवस्थापक बनावे. ओढ्यांचा व्यवस्थापक, शेतीचा व्यवस्थापक, जंगलांचा व्यवस्थापक' इत्यादी. ही कल्पना उत्तम आहे. याकरता सरकारनं त्यांना योग्य मोबदला द्यावा, प्रोत्साहन द्यावे. शहरी तरुणांनी तिथे जाऊन ही तंत्रे शिकावी, अनुभवांची आदानप्रदान व्हावी. यामुळे ग्रामीण तरुणांचा आत्मविश्वास वाढेल आणि आत्ता जिथे निसर्ग थोड्या प्रमाणात तरी शिल्लक आहे त्याचा आदर केला जाईल आणि तिथे तो वाढीस लागेल. यामुळे स्थलांतरामुळे निर्माण होणारे शहरातले प्रश्न काही अंशी कमी होऊ शकतील, शहरांच्या वाढीमुळे होणारे पर्यावरणाचे प्रश्न कमी होऊ शकतील. सध्या शहरे ही साधारतः ग्रामीण आणि नैसर्गिक भागांवर आक्रमण करून तगत आहेत. ग्रामीण भागातल्या पर्यावरणपूरक विकासामुळे ग्रामीण आणि शहरी विकास यात समतोल राखला जाईल.

शिक्षणातील योग्य बदल, सरकार दरबारी याविषयाची जाणीव, जबाबदार उद्योग जगत इत्यादी गोष्टींच्या बरोबरीने आपण निश्चितच खऱ्या अर्थाने निसर्ग संवर्धन करू शकू!

•

**केतकी घाटे**
thinkofketaki@gmail.com